# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सांगली **P.S.(ठाणे):** इस्लामपूर **Year (वर्ष):** 2022
   **FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0571 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 17/09/2022 03:04 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
      **Time Period (कालावधी):**
      **Date From (दिनांक पासून):** 16/09/2022
      **Date To ( दिनांक पर्यंत):** 17/09/2022
      **Time From (वेळेपासून):** 13:37 बजे
      **Time To (वेळेपर्यंत):** 02:00 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
   **Date (दिनांक ):** 17/09/2022 **Time (वेळ):** 02:10 बजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
   **Entry No. (नोंद क्र.):** 004 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 17/09/2022 02:26 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम, 4 किमी
   **Beat No. (बिट क्र.):**

   (b) **Address (पत्ता):** तलाठी कार्यालय समोर पटांगणामध, कापुसखेड ,वाळवा

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
   **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):** इस्लामपूर
   **District(State) (जिल्हा(राज्य)):** सांगली(महाराष्ट्र)

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**
   (a) **Name (नाव):** सिद्धार्थ जयवंतराव पाटील
   (b) **Father's Name (वडील चे नाव) :** जयवंतराव पाटील
   (c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1997 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
   (e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
   (f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**
   **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
   (g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
   ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |



Scanned with OKEN Scanner

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | कापुसखेड, ता वाळवा,इस्लामपूर,सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | कापुसखेड, ता वाळवा,इस्लामपूर,सांगली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सुनिल बाबुराव जावीर | | वडील का नाम : बाबुराव जावीर | 1. मिरजवाडी, ,ता वाळवा,इस्लामपूर, सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | गणेश दिनकर पाटील | | वडील का नाम : दिनकर पाटील | 1. कापूसखेड, ,ता वाळवा,इस्लामपूर, सांगली,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 15,000/ रू. | 15,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 15,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

वर्दीजबाब वर्दी जबाब ता. 16.09.2022मी सिद्धार्थ जयवंतराव पाटील वय 25 वर्ष व्यवसाय :- सिव्हील इंजिनियर, रा. कापुसखेड, ता. वाळवा, जि. सांगली मो.नं.9511967477.मी वरील ठिकाणी माझ्या कुंटूबासहीत राहण्यास असुन मी सिव्हील इंजिनियरचा व्यवसाय करीत असतो. माझी आई श्रीमती मधुमती जयवंतराव पाटील ही वारस असलेली कापुसखेड गावचे हद्दीतील गट नंबर 207 ही 10 गुंठे बागायत शेतजमीन इतर वारस 1) राजाक्का वसंत पाटील, 2) अरविंद राजाराम पाटील, 3) संभाजी बाबुराव पाटील, 4) रोहित जयवंत पाटील, 5) स्वप्नाली सतीश पाटील, 6) सुनंदा सतिश पाटील, 7) अभिषेक सतीश पाटील सर्व रा. कापुसखेड वाळवा व मी असे आम्ही सर्वानी आई श्रीमती मधुमती जयवंतराव पाटील हिचे नांवे दुय्यम निबंधक कार्यालय वाळवा या कार्यालयात कायम खुषखरेदीपत्र क्र 3629/2022 दि. 06.09.2022 अन्वये विनामोबदला लिहुन दिलेली आहे. दुय्यम निबंधक कार्यालय वाळवा यांचे कार्यालयात केलेल्या कायम खुषखरेदीपत्र क्र 3629/2022 चा ऑनलाईन फेरफार सात बारा उतायावर नोंद होणे करीता तलाठी कापूसखेड यांचे लगीनला गेलेला आहे. तलाठी सुनिल जावीर यांनी माझा भाऊ रोहीत याला संपर्क करुन तलाठी कार्यालयामध्ये खरेदीदस्त व अर्ज देणे बाबत सांगीतल्याने मी तलाठी जावीर यांची तहसिलदार कार्यालय इस्लामपुरचे बाहेर भेट घेतली असता त्यांनी मला खरेदीदस्त व अर्ज देण्यास सांगुन नोंदीकरीता माझेकडे 15,000/- रुपये व माझा चुलत भाऊ अभिषेक सतिश पाटील यांचे असलेल्या नोंदीचे 15,000/- रुपये असे दोघांचे मिळुन 30,000/- रूपये लागतील असे सांगुन मला माझे आईचे नावाचा अर्ज देण्यास सांगीतला. मी तलाठी सुनिल जावीर यांना 15,000/- रूपये द्यायचे होणार नाहीत असे सांगीतले परंतु तलाठी सुनिल जावीर यांनी रक्कम कमी करण्यास नकार देवुन 15,000/- रुपये दिले नाहीत तर नोंद रद्द होईल असे मला सांगीतले. मी 15,000/- रूपये सुनिल जावीर यांना नाही दिले तर तलाठी जावीर नोंद धरणेचे काम रद्द करतील अशी माझी खात्री झाली आहे. माझेकडे तलाठी सुनिल जावीर यांनी 15,000/- रूपये लाचेची मागणी केली असुन मला सुनिल जावीर यांना लाच देण्याची इच्छा नाही. तलाठी जावीर यांनी लाचमागणी केले बाबत दि.13.09.2022 रोजी मी माझे मोबाईलवर केलेले रेकर्डींग माझेकडे आहे. मला तलाठी सुनिल जावीर यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने दि.14.09.2022 रोजी मी श्री. विनायक भिलारे, पोलीस निरीक्षक, अन्टी करप्शन ब्युरो सांगली यांची अन्टी करप्शन कार्यालय सांगली येथे भेट घेवुन त्यांना वरील प्रमाणे तक्रार सांगीतली. त्यानंतर मी श्री.सुनिल जावीर, तलाठी कापुसखेड यांचे विरूध्दचा लाच मागणी केले बाबतचा तक्रारी अर्ज श्री.भिलारे साहेब यांना दिला. भिलारे साहेब यांनी मला त्यांचे ब्युरोच्या कार्यप्रणाली प्रमाणे



Scanned with OKEN Scanner

यंाना घडलेली हकिगत विचारली त्याप्रमाणे आम्ही हकिगत सांगीतली. त्यानंतर डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मधील पडताळणीचे वेळी ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण मी, भिलारे साहेब व दोन्ही पंचानी ऐकून खात्री केली.

श्री.सुनील जावीर यांनी माझी आई वारस असलेल्या शेतजमीनीची इतर वारसांनी कायमखुष खरेदीपत्रांने माझे आईचे नांवाने करुन दिलेल्या गट नंबर 207 मधील 10 गुंठे शेतजमीनीची सात बारा उता-यावर नोंद धरणे करीता माझेकडे 15,000/- रुपये व माझा चुलत भाऊ अभिषेक सतिश पाटील यांचेपण खरेदी दस्ताची सात बारा उता-यावर नोंद धरणे करीता 15,000/- रुपये असे दोघांचे मिळुन 30,000/- रुपये माझेकडे मागणी करुन माझे कामाचे 15,000/- रुपये व सात बारा उता-यावर आईचे नावाची नोंद होणेबाबतचा आईचा अर्ज घेवुन तलाठी कार्यालय कापूसखेड येथे घेवून येण्यास सांगीतल्याने दि.16.09.2022 रोजी तलाठी सुनिल जावीरयांचे विरूध्द सापळा लावण्याचे एसीबी पथकाने ठरवले.

त्यानंतर भिलारे साहेब यांनी मला दि.16.09.2022 रोजी संपर्क केल्यानंतर इस्लामपुर ज्ञानदीप शाळेजवळ हजर राहण्याबाबत व संपर्क केल्यानंतर भेट घेण्याबाबत सुचना दिल्या व मला जाण्यास सांगीतले त्याप्रमाणे मी निघून गेलो.

त्यानंतर दि.16.09.2022 रोजी भिलारे साहेब यांनी संपर्क केल्यानंतर पावणे बारा वाजण्याचे सुमारास ज्ञानदीप इंग्लीश मेडीयम स्कुल इस्लामपुर येथे जाऊन भिलारे साहेब यांची भेट घेतली. भिलारे साहेब व घाटगे साहेब यांचे सोबत दोन्ही पंच व सापळा पथक हजर होते. भिलारे साहेब यंानी मला त्यांचेकडील वाहनामध्ये बसण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी जाऊन बसलो.

त्यानंतर भिलारे साहेबांनी सापळा कारवाईचे ठिकाण निश्चित करणे करीता तलाठी सुनिल जावीर यांना फोन करणे बाबत सुचना दिल्या. त्याप्रमाणे मी माझे मोबाईलवरुन सुनिल जावीर यांना फोन करुन मोबाईल स्पिकर फोन मोडवर घेतला, तलाठी जावीर यांनी माझा कॉल रिसीव्ह केल्यानंतर लागलीच भिलारे साहेबांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन माझे समोर धरला त्यावेळी सुनिल जावीर यांनी मला चावडीत असल्याचे सांगुन डॉक्युमेंट चावडीत घेवुन येण्यास सांगुन कॉल कट केला लागलीच भिलारे साहेबांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बंद केला.

तलाठी सुनिल जावीर यांनी मला चावडी कार्यालय कापूसखेड येथे बोलवले असल्याने भिलारे साहेबांनी त्यांचे विरुद्ध सापळा कारवाई आयोजित करण्याचे निश्चित केले. त्यानंतर आम्ही सर्व ज्ञानदीप इंग्लीश मेडीयम स्कुल जवळुन रवाना होवुन कापुसखेड गांवचे अलीकडे काही अंतरावर दाखल झालो.

त्यानंतर भिलारे साहेब यांनी सुनिल जावीर, तलाठी यांना लाच म्हणून देण्यासाठी लाच रक्कम 15,000/- रुपये हजर करणेस सांगीतली. मी माझ्याकडे उपलब्ध असलेली 15,000/- रूपये त्यांचे समक्ष हजर केले. त्यावेळी सदर 15,000/-रुपयाचे नोटांचे नंबर भिलारे साहेब यांनी एका को-या कागदावर पंचाचे समक्ष लिहून घेतले. त्यानंतर भिलारे साहेबांच्या सुचनेवरून दोन्ही पंचंानी माझी अंगझडती घेतली. त्यानंतर भिलारे साहेब यांनी अॅथ्रासिन पावडरचे उपयोग व गुणधर्म सांगीतले. त्यानंतर मकानदार पोलीस यांनी 15,000/- रुपये रकमेच्या नोटांना अॅथ्रासिन पावडर लावून ती लाच रक्कम माझ्या पॅन्टचे समोरील उजवे बाजूच्या खिशात ठेवली. त्यानंतर भिलारे साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकार्डर मध्ये नवीन कार्ड टाकले. त्यानंतर भिलारे साहेबांनी मला, दोन्ही पंच व सापळा पथकाला आवश्यक त्या सुचना दिल्या.

त्यानंतर भिलारे साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरू करून माझ्याकडे दिला. मी व पंच जेधे असे माझेकडील मोटर सायकलवरुन रवाना होऊन चावडी कार्यालयात कापूसखेड येथे गेलो. सदर ठिकाणी पंच जेधे यांनी मोटर सायकल पार्क केली. मी व पंच जेधे असे चावडी कार्यालयात गेलो. तलाठी जावीर इतर लोकांशी कामा बाबत चर्चा करीत होते. त्यांनी माझेकडून माझे आईचे नांवाची सात बारा उता-यावर नोंद होणेचा अर्ज घेवुन कोतवाल नाथाभाऊ धुमाळे यांचेकडे दिला. तलाठी जावीर मी व पंच जेधे असे तलाठी कार्यालयातून बाहेर आलो. मी तलाठी जावीर यांना तुम्ही म्हणल्याप्रमाणे आणले असल्याचे सांगीतले. त्यावर त्यांनी मला जरा थांबा असे सांगीतले. त्यावेळी तेथे हजर असलेले आमच्या गांवातील गणेश पाटील याला उद्देशुन तलाठी जावीर यांनी मारुती अल्टो कारची चावी घेवुन गाडीमध्ये जाणेस सांगीतले. त्यावर गणेश पाटील यांनी चावी कुठे आहे असे तलाठी जावीर यांना विचारले असता, तलाठी जावीर यांनी चावी ड्रॉवरमध्ये असल्याचे सांगीतले. त्यानंतर गणेश पाटील तलाठी कार्यालयात गेला व अल्टो कारची चावी घेवुन आमचे जवळ आला. त्यावेळी तलाठी जावीर यांनी मला आता एकदा सांगतुस एक, एकदा सांगतो एक जा पुढं ड्रॉवरमध्ये ठेव जा असे मला सांगीतल्याने मी व गणेश पाटील असे जावीर यांचे तलाठी कार्यालयाचे समोर पटांगणात पार्क केलेल्या अल्टो कार जवळ गेलो. गणेश पाटील यांनी कारचा क्लिनर साईडचा दरवाजा उघडला आणि मला किती आणले आहेत असे विचारले असता मी गणेश पाटील यांना पंधरा हजार रुपये आणले असले बाबत सांगीतले. त्यावेळी गणेश पाटील यांनी गाडीमधील डॅशबोर्ड उघडुन मला पंधरा हजार रुपये लाच रक्कम ठेवणे बाबत इशारा केला. गणेश पाटील यांनी केले इशा-या प्रनाणे मी माझे पॅन्टचे उजवे बाजुचे खिश्यातील लाच रक्कम माझे उजवे हाताने बाहेर काढुन तलाठी ज़ावीर यांचे अल्टो कारचे डॅशबोर्डमध्ये ठेवली. त्यानंतर मी व पचं जेधे असे तेथून बाजु मारुती मंदीराचे समोर आलो आणि मी माझे डावे हाताने माझ्या पॅन्टच्या डाव्या बाजुच्या खिश्यातील हातरुमाल बाहेर काढुन माझे तोंड पुसुन लाच स्विकारले बाबत पुर्वनियोजित इशारा केला. लागलीच भिलारे साहेब, व पथक माझ्या जवळ आले. भिलारे साहेब यांनी माझ्याकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून बंद करून त्यांचे ताब्यात घेतला. दरम्यान मुदतीत तलाठी सुनिल जावीर व गणेश पाटील असे गर्दीचा फायदा घेवुन पळून गेले. सापळा पथकाने आजुबाजुस शोध घेतला असता ते मिळुन आले नाहीत. आम्ही सर्व तलाठी जावीर यांचे मारुती अल्टो कार नं एम.एच. 11 वाय 7560 जवळ आलो. मारुती अल्टो कारचे दरवाजे लॉक असल्याने भिलारे साहेबांचे सुचने प्रमाणे पंच जेधे यांनी तलाठी कार्यालयातील लोखंडी फुट पट्टीचे सहायाने क्लिनर साईडचा दरवाजा उघडला. भिलारे साहेबांनी दिले सुचने प्रमाणे पंच राऊत यांनी गाडीचा डॅश बोर्ड उघडून त्यामधील  बालाजी ज्वेलर्स या नावची प्रिंट असलेल्या गुलाबी रंगाच्या पिशवीवर ठेवलेली लाच रक्कम ताब्यात घेण्यास सांगीतली. त्याप्रमाणे पंच राऊत यांनी सदर लाच रक्कम ताब्यात घेवुन मोजुन पंधरा हजार रुपये असल्याचे भिलारे साहेबांना सांगीतले. त्यानंतर भिलारे साहेबांनी लाच रक्कमेतील नोटांचे नंबर को-या कागदावर लिहीलेल्या नंबराशी जुळून आले. त्यानंतर भिलारे साहेबांनी मारुती अल्टोकारमध्ये अंधार करुन गाडीचे डॅशबोर्डमध्ये लाच रक्कमेखाली असलेल्या पिशवीची व लाच रक्कमेशी तपासणी केली असता लाच रक्कम व त्याखालील पिशवीवर अॅन्थ्रासिंन पावडरची चकाकी दिसून आली.

त्यानंतर भिलारे साहेबांनी दिले सुचने प्रमाणे मी दोन्ही पंच व सापळा पथक तलाठी कार्यालयात गेलो. भिलारे साहेबांनी तलाठी कार्यालयामध्ये अंधार करुन माझे हात व कपडे तपासण्यात आले. त्यावेळी माझे उजवे हाताचे बोटावर व पॅन्टचे समोरील उजवे बाजूच्या खिशाचे तोंडास अॅन्थ्रासिंन पावडरची चकाकी दिसून आली. त्यानंतर भिलारे साहेब यांनी मला बाहेर जावुन थांबण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी बाहेर जावुन थांबलो. काही वेळाने भिलारे साहेब यांनी मला शासकीय विश्रामगृह इस्लामपुर या ठिकाणी हजर राहण्याबाबत सुचना दिल्या. त्याप्रमाणे मी शासकीय विश्रामगृह इस्लामपुर या ठिकाणी हजर झालो.

भिलारे साहेबांनी त्यांची पुढील कारवाई सुरु ठेवली. त्यांनतर थोडयावेळाने भिलारे साहेबांनी मला बोलावून घेतले. त्यांचे सुचनेवरुन दोन्ही पंचानी माझी अंगझडती घेतली, त्यानंतर मला विश्रामगृहाचे बाहेर जावून थांबण्यास सांगीतले, त्याप्रमाणे मी बाहेर जावून थांबलो. त्यानंतर पुन्हा थोडया वेळाने भिलारे साहेब यांनी मला बोलावुन घेवुन सापळयाची हकीकत विचारली. त्यावेळी मी त्यांना सापळयाची सविस्तर हकीकत सांगीतली. दरम्यान मुदतीत तलाठी सुनिल जावीर हे विश्रामगृह येथे भिलारे साहेबांचे समोर हजर झाल्याचे समजले. भिलारे साहेबांनी घडले



Scanned with OKEN Scanner

घटनेचा सविस्तर पंचनामा केला. सदर कारवाई दरम्यान सुनिल जावीर यांचे पुर्ण नाव श्री. सुनिल बाबुराव जावीर, तलाठी कापुसखेड, रा. मिरजवाडी, ता. वाळवा, जि. सांगली असे असल्याचे मला समजले आहे.
माझी आई श्रीमती मधुमती जयवंतराव पाटील ही वारस असलेल्या कापुसखेड गावातील गट नं 207 मधील 10 गुंठे शेतजमीन इतर वारसानी व मी दुय्यम निबंधक कार्यालय वाळवा येथे कायम खुशखरेदीपत्राने विनामोबदला घेता माझे आईचे नांवाने करुन दिली आहे. सदर खुशखरेदीपत्रप्रमाणे माझे आईची सात बारा उता-यावर नोंद घेणे करीता तलाठी सुनिल जावीर यांनी माझेकडे 15000/- रुपये व माझा चुलत भाऊ अभिषेक याचे खरेदी दस्ताची नोंद धरणे करीता त्यांचे 15,000/- रुपये असे एकुण 30,000/- रुपये माझेकडे लाच मागणी करुन तलाठी सुनिल जावीर याचे सांगणे वरुन आमचे गावातील गणेश दिनकर पाटील यांने 15,000/- रुपये लाच रक्कम स्विकारण्यास तलाठी सुनिल जावीर यांना मदत केल्याने माझी तलाठी सुनिल बाबुराव जावीर व गणेश दिनकर पाटील यांचे विरूध्द माझी फिर्याद आहे.
माझा मराठी मध्ये टाईप केलेला वर्दी जबाब मी वाचून पाहीला, तो माझे सांगणे प्रमाणे बरोबर टंकलिखीत केलेला आहे.
समक्ष हा दिला वर्दीजबाब,

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** shashikant bharat chavan(I (Inspector)) / DGPSBCM7202 **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
**Rank (पद):**
**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**
**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14.Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

Spatil · सिद्धार्थ जयवंतराव पाटील.

**15.Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची**

**Name (नाव):** shashikant bharat chavan
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** DGPSBCM7202

पोलीस स्टेशन ऑफीसर
इस्लामपूर पोलीस ठाणे
ता. वाळवा, जि. सांगली.



Scanned with OKEN Scanner

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):**
**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोंदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)



Scanned with OKEN Scanner